महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

सोमवार ■ ११ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०५१ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# देशातील ३३४ राजकीय पक्षांची नोंदणी रद्द

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

केंद्रीय निवडणूक आयोगाने देशभरातील 334 पक्षांची नोंदणी केली आहे. निवडणूक आयोगाच्या नवीन कारवाईनंतर, आता देशात फक्त 6 राष्ट्रीय पक्ष उरले आहेत. त्यामध्ये अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष (आप), मायावतींचा बहुजन समाज पक्ष (बसपा), देशातील सत्ताधारी भारतीय जनता पक्ष (भाजप), भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), प्रमुख विरोधी काँग्रेस आणि राष्ट्रीय पीपल्स पार्टी (एनपीपी) यांचा समावेश आहे.

देशातील राजकीय पक्षांची (राष्ट्रीय / राज्य / बिगर मान्यता प्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्ष - RUPPs) लोकप्रतिनिधित्व कायदा, 1951 च्या कलम 29A च्या तरतुदींनुसार निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली जाते. सध्या, निवडणूक आयोगाकडे 6 राष्ट्रीय पक्ष 67 राज्य पक्ष आणि 2854 बिगर मान्यता प्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्षांची (RUPPs) नोंदणी आहे.

राजकीय पक्षांच्या नोंदणीसाठीच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, जर एखाद्या पक्षाने सलग 6 वर्षे निवडणुका लढवल्या नाहीत, तर त्या पक्षाचे नाव नोंदणीकृत पक्षांच्या यादीतून वगळले जाईल. याव्यतिरिक्त, लोकप्रतिनिधित्व कायदा, 1951 च्या कलम 29A नुसार, पक्षांना नोंदणीच्या वेळी त्यांचे नाव, पत्ता, पदाधिकारी इत्यादी तपशील देणे गरजेचे असते तसेच कोणत्याही बदलाची माहिती आयोगाला तात्काळ कळवणे



आवश्यक असते.

यापूर्वी, जून 2025 मध्ये, निवडणूक आयोगाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना (CEOs) वरील नियमांचे पालन केले जात आहे किंवा नाही यासंबधी 345 बिगर मान्यता प्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्षांची (RUPPs) पडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. यानंतर मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी चौकशी केली, या बिगर मान्यता प्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्षांना (RUPPs) कारणे दाखवा नोटीस पाठवली तसेच प्रत्येक पक्षाला त्यांची बाजू मांडण्यासाठी वैयक्तिक सुनावणीची संधी दिली.

त्यानंतर, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशी अहवालात, एकूण 345 बिगर मान्यताप्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्षांपैकी (RUPPs) 334 बिगर मान्यता प्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्ष (RUPPs) वर नमूद अटींचे पालन करत नसल्याचे आढळले. तर उर्वरित प्रकरणांची पुन्हा पडताळणी केली जावी यासाठी ती मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे परत पाठवण्यात आली आहेत.

सर्व तथ्ये आणि मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या शिफारशींचा विचार केल्यानंतर आयोगाने 334 बिगर मान्यता प्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्ष (RUPPs) वगळले आहेत.

आता, एकूण 2854 बिगर मान्यता प्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्षांपैकी (RUPPs) 2520 शिल्लक आहेत. ही कार्यवाही म्हणजे निवडणूक व्यवस्था पूर्णतः निर्दोष करण्याच्या निवडणूक आयोगाच्या सर्वसमावेशक आणि निरंतर धोरणाचा हा एक भाग आहे.

हे बिगर मान्यता प्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्ष (RUPPs) लोकप्रतिनिधित्व कायदा, 1951 च्या कलम 29B आणि 29C मधील तरतुदींनुसार, प्राप्तीकर कायदा, 1961 आणि निवडणूक चिन्हे (आरक्षण आणि वाटप) आदेश, 1968 शी संबंधित कोणत्याही तरतुदींनुसार कोणताही लाभ घेण्यासाठी पात्र असणार नाहीत. या आदेशाने बाधित झालेला कोणताही पक्ष, आदेशाच्या 30 दिवसांच्या आत आयोगाकडे अपील करू शकतो.



# ठाणे वर्षा मॅरेथॉनमध्ये पुरुष गटात धर्मेंद्र; तर महिला गटात रविना गायकवाड विजेते

- ३१वी ठाणे महापालिका वर्षा मॅरेथॉन
- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि लता शिंदे यांनी दाखवला मॅरेथॉनला झेंडा
- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही घेतला मॅरेथॉनमधील धावण्याचा आनंद
- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक यांच्या हस्ते झाले पारितोषिक वितरण
- ठाणे महापालिका आणि ठाणे जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन यांनी केले आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे / दिनांक १०**

'मॅरेथॉन ठाण्याची.. उर्जा तरुणाईची' या घोषवाक्यासह आयोजित करण्यात आलेल्या एकतिसाव्या ठाणे महानगरपालिका वर्षा मॅरेथॉन या स्पर्धेत पुरुष गटात पुण्याच्या एएसआयच्या धर्मेंद्र याने अव्वल स्थान पटकावले. त्याने ०१ तास ०७ मिनिटे आणि ४१ सेकंद वेळेसह २१ किमीचे अंतर पार केले. तर, महिला गटात नाशिकच्या रविना गायकवाड यांनी ०१ तास २५ मिनिटे आणि ४६ सेकंद वेळ घेत शर्यत पूर्ण केली.

या स्पर्धेत सुमारे २५ हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पत्नी लता शिंदे यांनी मॅरेथॉनला झेंडा दाखवला. तर, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक यांच्या हस्ते विजेत्या धावपटूंना गौरविण्यात आले. कोरोनापासून गेली पाच वर्षे खंडित झालेली ही स्पर्धा यंदा आबालवृद्धांच्या सहभागाने अत्यंत उत्साहात झाली. यावेळी सहभागी धावपटूंचा उत्साह पाहून मॅरेथॉनला झेंडा दाखवल्यानंतर स्वत: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मॅरेथॉनमध्ये धावण्याचा आनंद घेतला. त्यांनी धावपटूंसमवेत काही अंतर धावून त्यांचा उत्साह वाढवला. ठाणे महानगरपालिका आणि ठाणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या ३१व्या वर्षा मॅरेथॉनचे रविवार सकाळी आयोजन करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुरुष गटाच्या तर लता शिंदे यांनी महिला गटाच्या स्पर्धेला झेंडा दाखवला. त्यानंतर, टप्प्याटप्याने एकूण १२ गटातील स्पर्धांचा शुभारंभ महापालिका मुख्यालयासमोरील चौकातून करण्यात आला.

याप्रसंगी, खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी उपमहापौर पल्लवी कदम, महापालिका आयुक्त सौरभ राव, माजी ज्येष्ठ नगरसेवक राम रेपाळे, एकनाथ भोईर, परिवहन सेवेचे माजी सभापती विलास जोशी, माजी नगरसेवक पवन कदम, विकास रेपाळे, नम्रता भोसले, राजेश मोरे, सिद्धार्थ ओवळेकर, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, परिवहन व्यवस्थापन भालचंद्र बेहरे, उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, सचिन सांगळे, दिनेश तायडे, शंकर पाटोळे, मिताली संचेती, क्रीडा उपायुक्त मीनल पालांडे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद पाटील आदी उपस्थित होते.

# अंबरनाथमध्ये शिवसेनेची ताकद वाढली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ, ता. १० (वार्ताहर) :** राज्यातील शिवसेनेत पक्ष प्रवेशाची लाट अंबरनाथपर्यंत पोहोचली आहे. ठाण्यातील आनंद आश्रम येथे कल्याण लोकसभेतील भव्य प्रवेश सोहळा शुक्रवारी पार पडला. शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रवेशामुळे अंबरनाथ विभागातील शिवसेनेची संघटनात्मक ताकद मोठ्या प्रमाणात वाढली.

अंबरनाथ मनसेचे शहराध्यक्ष, माजी नगरसेवक व माजी सभापती कुणाल भोईर, जिल्हा संघटक व माजी नगरसेवक संदीप लकडे, शहर संघटक व माजी नगरसेवक स्वप्नील बागुल, माजी नगरसेविका अपर्णा कुणाल भोईर, विभाग अध्यक्ष चंद्रकांत चौघुले, महेश सावंत, प्रशांत भोईर यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. त्याचबरोबर अंबरनाथ शहरातील मनसेचे उपविभागाध्यक्ष, शाखाध्यक्ष, पदाधिकारी आणि अनेक मनसैनिकही शिवबंधनात अडकले. आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अंबरनाथमधील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मनसेच्या प्रभावी पदाधिकाऱ्यांनी पक्ष सोडल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. ठाकरे गट व मनसे युतीच्या चर्चांना रंग चढत असतानाच शिंदे गटाने मनसेला मोठा झटका दिल्याची चर्चा सुरू आहे. मनसेच्या जिल्हा संघटक, शहराध्यक्ष आणि शहर संघटकांनी मनसेला रामराम ठोकत, थेट शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. त्यामुळे आता ठाकरे बंधूंची युती होण्यापूर्वीच एकनाथ शिंदेंनी मनसेला मोठा धोबीपछाड दिल्याची चर्चा शहरात रंगली.



**जे गेले त्यांच्या जाण्याने आम्हाला काही फरक पडत नाही. पक्षाने ज्यांना भरभरून दिले, मोठे केले, त्यांच्यावर राज ठाकरे, राजू पाटील, अविनाश जाधव यांनी प्रेम केले. अशा लोकांनीच गद्दारी केली. ते व्यापारी होते, व्यापार वाढवण्यासाठी गेले, विकासासाठी नाही.**
**- बंडू देशमुख, जिल्हाध्यक्ष, मनसे**

## थोडक्यात महत्वाचे

# राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने दहीहंडी सरावांचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली, ता. १०** नारळी पौर्णिमेचे औचित्य साधून गावदेवी-नवागाव, देवीचा पाडा, राहुलनगर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व राहुल नगर मित्रमंडळाच्या वतीने सराव दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाला गोविंदा पथकांनी मोठा प्रतिसाद दिला. सुमारे ६५ गोविंदा पथके या महोत्सवात सहभागी झाली होती. आयरे येथील गोविंदा पथकाने रचलेले दहीहंडीचे चक्री थर कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

माजी आमदार, जिल्हाध्यक्ष जगन्नाथ रिदि यांच्यामार्फत सर्व



गोविंदा पथकांना सन्मानचिन्ह देऊन प्रथमोपचार किटचे वाटप करण्यात आले. या वेळी सराव हंडी फोडायचा प्रथम मान वेताळबाबा गोविंदा पथकाने पटकावत मानाची हंडी फोडली. तर दुसरा मान शिवतेज गोविंदा पथकाने पटकावत उंच थर लावत मानाची हंडी फोडली.

# मांडा -टिटवाळ्यात आदिवासी दिन साजरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा : प्रतिनिधी**

आदिवासी समाजाच्या ऐक्य, परंपरा आणि संस्कृतीचे दर्शन घडवणारा जागतिक आदिवासीदिन मांडा-टिटवाळा येथे शनिवारी (ता. ९) उत्साहात साजरा करण्यात आला. आदिवासी सामाजिक फाउंडेशन, मांडा-टिटवाळा यांच्या वतीने आयोजित या भव्य रॅलीत परिसरातील विविध आदिवासी समाजबांधवांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. ज्ञानेश्वर चौक, पंचवटी बिल्डिंग (प.) येथून रॅलीला सुरुवात झाली. 'एक तीर, एक कमान सारे आदिवासी एकसमान' या घोषणांनी परिसर दुमदुमला. रॅलीत आदिवासी समाजातील पारंपरिक वेशभूषा, ढोल-नगारे, सांस्कृतिक पथके, आदिवासी बॅण्ड, तारपा नृत्य तसेच पारंपरिक नृत्य पथकांच्या देखण्या सादरीकरणांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आदिवासी सामाजिक फाउंडेशन, टिटवाळाचे अध्यक्ष, व माजी उपमहापौर बुधाराम सरनबोत यांनी उपस्थित होते.

# कल्याण रिमॉडेलिंग प्रकल्प फास्ट ट्रॅकवर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. १० (बातमीदार) :** कल्याण रेल्वे रिमॉडेलिंग प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून, प्रकल्प मार्च २०२७ पर्यंत पूर्ण होणार आहे. यामुळे कल्याण स्थानकाचा येत्या दोन वर्षांत संपूर्ण कायापालट होणार आहे. सध्या कल्याण पूर्व भागात नवीन ट्रॅक टाकणे, फूटओव्हर ब्रिजवर कव्हरिंग शेड, डेकचे गर्डर आणि जुन्या गुड्स यार्ड ट्रॅक्स काढून नवीन टाकण्याची कामे सुरू आहेत.

रिमॉडेलिंग प्रकल्पात एक्स्प्रेस आणि लोकल गाड्यांसाठी नवीन व स्वतंत्र फलाटांची बांधणी, गुड्स यार्डसाठी वेगळ्या रिसेप्शन आणि डिस्पॅच लाइन, तीन नवीन फूटओव्हर ब्रिज, फलाटांवर मोठ्या स्लॅबचे बांधकाम, एलिवेटेड डेक/सॅटिस प्रकल्पाचाही समावेश आहे. हे काम २०२७ पर्यंत पूर्ण व्हावे, अशीच शहरवासीयांची अपेक्षा आहे.

# वसई विरार पालिकेचा प्रभागरचना आराखडा शासनाला सादर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**विरार, ता. १० (बातमीदार)**

मागील पाच वर्षांपासून रखडलेल्या वसई-विरार पालिकेच्या निवडणुकीचा मार्ग आता मोकळा झाला आहे. यासंदर्भात निवडणूक आयोगाने तयारी सुरू केली आहे. पालिकेने प्रभागरचनेचा प्रारूप आराखडा शासनाला सादर केला असून, तो मंजुरीसाठी नगरविकास मंत्रालयाकडे आहे. यामुळे आता निवडणूक होणार, यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

पाच वर्षांपासून रखडलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार प्रभागरचना प्रारूप आराखडा तयार करण्याचे निर्देश निवडणूक आयोग आणि शासनाकडून संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने प्रभागांची रचना कशा प्रकारे करण्यात यावी, यासंदर्भात परिपत्रक काढून जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त आणि नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना कळविले होते.



वसई विरार महापालिका क वर्गामध्ये मोडत असल्याने येथील प्रभागांची रचना महापालिका आयुक्तांकडून केली जात आहे. निवडणूक आयोगाच्या पत्रानुसार वसई-विरार पालिकेने आरक्षित प्रभागांची जाहीर सोडत यापूर्वी २१ मे २०२२ रोजी काढली होती. प्रभागनिहाय आरक्षण प्रसिद्ध करून त्यावर १ जून ते ६ जून २०२२ या कालावधीमध्ये हरकती व सूचना मागविण्यात आल्या. त्यानंतर १३ मे २०२२ रोजी पुढील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध केली. त्या वेळी सदस्य संख्या ११ने वाढवून १२६ करण्यात आली होती. आता मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ओबीसी जागांचा मुद्दा निवडणुकीसाठी निकाली निघाला आहे. त्याचप्रमाणे चार सदस्यांचा एक प्रभाग अशाप्रकारे २०१७ मध्ये प्रभागांची रचना करण्यात आली. त्याचप्रमाणे प्रभागरचना प्रारूप आराखडा करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. त्यामुळे वसई-विरार पालिकेच्या निवडणुकीसाठी २९ प्रभागांची रचना करण्यात आली असून, प्रारूप आराखडा शासनाकडे सादर करण्यात आला आहे. २८ प्रभागांत चार नगरसेवक तर २९ व्या प्रभागात तीन अशाप्रकारे २९ प्रभागांत ११५ नगरसेवकांसाठी वसई-विरार महापालिकेची निवडणूक होणार आहे. महापालिकेकडून पाठविण्यात आलेल्या प्रभागरचना प्रारूप आराखड्याला २१ ऑगस्टपर्यंत निवडणूक आयोगाकडून मान्यता घ्यावी लागणार आहे.










# बदलापूर-कामोठे नवीन रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण सुरू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**बदलापूर ता. १० (बातमीदार)**

मध्य रेल्वे प्रशासनाकडून बदलापूर-कामोठे प्रस्तावित नवीन रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण सुरू आहे. सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करून प्रत्यक्ष काम लवकरच सुरू होणार आहे. या मार्गामुळे पनवेल-सीएसटी हार्बर मार्गिकेवरील प्रवाशांची संख्या वाढणार असल्याने वाहतूक व्यवस्थेवर अतिरिक्त भार पडणार आहे. कर्जत, खोपोली, बदलापूर, अंबरनाथ, नेरळ परिसर विकसित होत आहे. नवनवीन गृहप्रकल्प आले आहेत. कल्याण-शिळ रस्त्यावरील पलावा वसाहतीचे नेरळच्या दिशेने विस्तारीकरण होत आहे; पण मुंबईला रेल्वेने जाण्यासाठी कल्याण, ठाणे हा एकमेव रेल्वेमार्ग आहे. या गर्दीच्या विभाजनासाठी कल्याण ते मुंबई रेल्वेमार्गाला पर्याय म्हणून बदलापूर-कासगाव- पनवेलपर्यंतच्या ३४ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गासाठी कासगाव येथे रेल्वेस्थानक उभारणीसाठीचे नियोजन केले जात आहे. या मार्गामुळे कर्जत, बदलापूर, अंबरनाथकरांना नवा पर्याय मिळणार आहे; पण पनवेल, नवी मुंबईतील स्थानकांवर गर्दी वाढणार आहे.

**- नवी मुंबई, पनवेल परिसराची लोकसंख्या ६० लाखांवर गेली आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पार्श्वभूमीवर पुष्पकनगर, नैना विकसित होत आहेत. भविष्यात नवी मुंबई दक्षिण आणि उत्तरेकडील लोकवस्ती एक कोटीच्या घरात पोहोचणार आहे.**
**- पनवेल- सीएसएमटी मार्गिकवरील प्रवासी आणि लोकलच्या फेऱ्यांमध्ये तफावत आहे. गर्दीच्या वेळेत या मार्गावरून धीम्या गाड्या धावतात. जलद लोकल सेवा सुरू झालेली नाही, त्यामुळे बदलापूरवरून प्रवास सुरू झाल्यास ट्रेनमध्ये गर्दी वाढणार आहे.**

# भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची उद्या म्हणजे १२ ऑगस्ट रोजी जयंती. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लॉच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन ( चुंबकीय भूमध्य रेखा ) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लॉचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक



विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ सांशीधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे ( रॉकेट ) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची ( इसरो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रयक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत.' त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# खडवलीतील आदिवासी शाळेत जागतिक आदिवासी दिवस साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जागतिक आदिवासी दिनानिमित्ताने श्री गावदेवी शिक्षण संस्था खडवली संचलित अनुदानित आदिवासी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा खडवली यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली होती. रॅली मध्ये विद्यार्थ्यांनी आदिवासी वेशभूषा केली होती. खडवली पश्चिम येथुन रॅलीला सुरुवात करण्यात आली बाजारपेठ, संत तुकाराम महाराज चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पुन्हा खडवली आश्रमशाळेत संमाप्त करण्यात आली.

आश्रम शाळेच्या सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन केले होते. बेहरे ग्रामपंचायतीच्या सरपंच गिता कडव यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. उपस्थित पाहुण्यांच्याहस्ते




छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीवीर बिरसा मुंडा, राघोजी भांगरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित पाहुणे यांचा सन्मान श्री गावदेवी शिक्षण संस्था खडवली यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी शाळेत विद्यार्थ्यांनी आदिवासी नृत्य सादर केले.

कार्यक्रमाला सरपंच गिता कडव, उपसरपंच नरेश कथोरे, समाजसेवक गजानन कडव, माध्ययमिक शाळेचे मुख्याध्यापक दिपक चव्हाण, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक शरद गोतारणे, सचिव अजुन चव्हाण, शंकर चौधरी, यांच्या सह पालक, शिक्षण, तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय स्पर्धेत समीर जोगळेकरचं सुयश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : शहरातील पावर हाऊस जिमच्या खेळाडूंनी मेसाना गुजरात येथे पावर लिफ्टिंग स्पोर्ट्स ऑर्गनायझेशन यांच्या मान्यतेने तसेच देवाज फिटनेसचे देवांग पुजारा यांच्या पुढाकाराने एक ऑगस्ट ते तीन ऑगस्ट दरम्यान झालेल्या भव्य राष्ट्रीय स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी केली. यामध्ये मास्टर टू 66 किलो वजनी गटात समीर जोगळेकर यांनी राष्ट्रीय स्तरावर सलग तीन सुवर्णपदक पटकावले

तसेच पनवेलचे संभाजी अंकलेकर यांनी मास्टर फोर 83 वजनी गटात सलग तिसऱ्यांदा तीन सुवर्णपदके पटकवली. कल्याणचे शंकर ठाकूर यांनी मास्टर टू 93 वजनी गटात सलग दुसऱ्यांदा



तीन सुवर्णपदके पटकविली. कल्याणची गिरजेश रजक हिने सीनियर सीनियर मध्ये तीन सुवर्णपदके पटकविली तसेच मुंबईची प्रतिभा तावडे हिने तीन सुवर्णपदके पटकविले तसेच मुंबईची नीता नवर वृंदाराणे व पुण्याची दीपा दोडिया पावर रेटिंग मध्ये मास्टर वन मध्ये सुवर्णपदके पटकवली मास्टर टू मध्ये महिला गटात मुंबईची सरिता कदम हिने तीन सुवर्णपदके व कळव्याची अर्चना गोलकर यांनी तीन सुवर्णपदके पटकविली तसेच भांडुप ची पूर्वजागीरकर हिने ज्युनिअर महिला गटात तीन सुवर्णपदके पटकवली.

तर चंद्रपूरचा वीरेंद्र सिंग भाटी याने जुनियर मध्ये पॉवरलिफ्टिंग मध्ये एक सुवर्णपदक पाठविले तसेच या स्पर्धेमध्ये 15 राज्यातून सुमारे 275 पेक्षा जास्त खेळाडूंनी सहभाग घेतला तसेच या स्पर्धेचे उद्घाटन व पदक वितरण व मेसाना महानगरपालिकेचे आयुक्त रवींद्र खटाला सरचिटणीस दुर्गेश राजुरिया व महाराष्ट्र पॉवर लिफ्टिंग संघटनेचे प्रमुख सदसोंडे प्रमोद पाटील समीर जवळेकर व दिव्यश पुजारा ज्येष्ठ आंतरराष्ट्रीय खेळाडू दादा हलदार व प्रफुल जाधव यांच्या उपस्थितीत झाले तसेच पावर ऑफ जिमचे सर्व खेळाडूंचे अभिनंदन व कौतुक महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी केले.

# जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची आठवडी बाजाराला भेट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आमटेम येथे इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांची आठवडा बाजार, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र व मच्छी मार्केट या ठिकाणांना भेट दिली असता मुलांना खूपच आनंद वाटला.

तसेच व्यवहार कसा करावा , खरेदी किंमत विक्री किंमत त्याचबरोबर विविध वस्तूंचे वेगवेगळे उपयोग हे देखील त्यांना प्रत्यक्ष वस्तू




दाखवून सांगण्यात आले. वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या त्यांचे भाव कडधान्य घर कामातील वस्तू व वेगवेगळ्या प्रकारच्या अगरबत्ती फळांचे प्रकार कांदे बटाटे लसूण यांच्या भावातील फरक त्याचबरोबर मराठी बरोबर या वस्तूला इंग्रजीत काय म्हणतात हे देखील समजावण्यात आलं खाऊच्या वस्तू खूपच आवडल्या त्यातील काही श्रीखंड गोळया आणि इतर खरेदी केला आणि मग मच्छी मार्केटमध्ये गेलो सुकी मच्छी ओली मच्छी त्यामध्ये बोंबील कोलंबी यांचे भाव विचारले मग पाव किलो आणि अर्धा किलो किती अशा प्रकारे अतिशय उत्साहात आठवडा बाजार भेट संपन्न झाल्यानंतर प्राथमिक उपकेंद्र आरोग्य आमचे या ठिकाणाला भेट दिली काही वस्तूंचा परिचय करून घेतला डॉक्टरांसोबत चर्चा केली काही मुलांना तपासून घेतलं आणि काय खावं काय खाऊ नये याचे मार्गदर्शन केलं अशाप्रकारे एक मजेशीर आनंददायी चैतन्यदायी आणि बुद्धीला खुराक अशाप्रकारे भेट संपन्न झाली त्यांच्यासोबत संपूर्ण मार्गदर्शन महेंद्र पाटील यांनी केले.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत लाडक्या बहिणी महायुतीला आशीर्वाद देतील

## – आ.राजेश मोरे



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली शिवसेना शाखेत शेकडो महिलांनी आमदार राजेश मोरे यांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला. यावेळेस लाडक्या बहिणींनी मोठी गर्दी केली होती. यावेळी आमदार मोरे यांनी विधानसभेप्रमाणे येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत देखील लाडक्या बहिणी महायुतीला भरभरून आशीर्वाद देतील. आमचे सरकार आणि मी स्वतः या लाडक्या बहिणींच्या मागे असल्याचे मोरे यांनी सांगितले.

तर वरळीमध्ये शिवसेना महिला पदाधिकाऱ्यांना मारहाण प्रकरणी बोलताना राजेश मोरे यांनी या विरोधकांना सर्वसामान्य आणि गोरगरीब जनतेचे काही पडलं नाही. ज्यांनी मारहाण केली त्याच्यावर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी यावेळेस केली आहे.

# वाड्यात आदिवासी दिन साजरा




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : वाड्यामध्ये अनेक संघटना एकत्र येत आदिवासी समाजासाठी सन्मानाचा, अस्तित्वाचा असलेला दिवस 9 ऑगस्ट जागतिक आदिवासी दिन "संयुक्त उत्सव कमिटी" मार्फत साजरा केला. ह्यावेळी अनेक कला पथकांच्या माध्यमातून विविध पारंपारीक नृत्य सादर करत संस्कृती संवर्धनाचे काम करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात वाडा खंडेश्वरी नाका येथे प्रतिमा पूजनाने झाली. ह्यावेळी कार्यक्रम दरम्यान तालुक्यातील विद्यार्थी, पदाधिकारी, महिला बचत गट, कलावंत, आदर्श सरपंच व समाजातील 5 व्यक्तिमत्वाना समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

वाडा खंडेश्वरी नाका - बस स्टॅन्ड - वाणी आळी मार्गे पंचायत समिती पर्यंत रॅली काढत संविधानाचे पूजन करून कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला तालुक्यातील सामाजिक राजकीय पदाधिकारी समवेत प्रशासकीय पदाधिकारी व मोठ्या सख्येने समाजबांधव उपस्थित होते.

# केळठण विद्यालय कौशल्य विकास केंद्राच्या दुसऱ्या टप्प्यातील बांधकामाचे भुमिपूजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : सरस्वती गणपत पाटील विद्यालय, केळठण (वज्रेश्वरी) येथे कौशल्य विकास केंद्राच्या नवीन इमारतीच्या दुसऱ्या टप्प्याच्या बांधकामाच्या शुभारंभासाठी भूमिपूजन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या टप्प्यातील इमारतीच्या भूतलावर दहावी नंतरचे विद्यार्थी विविध व्यवसायाभिमुख कौशल्ये शिकू शकतील, यासाठी अनेक प्रशिक्षण अभ्यासक्रमांचा समावेश असणार आहे अशी माहिती मान्यवरांनी दिली.

सौंदर्य आणि त्वचा उपचार, शिवणकाम आणि फॅशन डिझाईन, चित्रकला व सुतारकाम, मोबाईल व इलेक्ट्रॉनिक उपकरणांची दुरुस्ती आदींचा या मध्ये समावेश असणार आहे. या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर विद्यार्थ्यांच्या अभ्यास व संशोधनासाठी सायन्स लॅब, संगणक



प्रयोगशाळा, ग्रंथालय, तसेच परिषद हॉल आणि ए.व्ही. सभागृह उभारले जाणार आहे.

या शुभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून राजीव शहा, व्यवस्थापकीय संचालक – एव्हरेस्ट फूड्स प्रा. लि., सौ. नूपुर देसाई, अध्यक्षा – रोटरी क्लब ऑफ बॉम्बे पियर, नितीन ओरायन, संस्थापक – लर्निंग स्पेस फाउंडेशन (या कार्यक्रमाचे आयोजक), के.जी. पाटील, अध्यक्ष – देवघर शिक्षण विभाग, आणि वाडा, भिवंडी परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

कौशल्य विकास केंद्र हे वज्रेश्वरी व परिसरातील वाडा, भिवंडी, वसई तालुक्यांतील अनेक ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी दहावीनंतर दर्जेदार व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी आणि पुढील जीवनोपयोगी संधी निर्माण करण्यासाठी एक सुवर्णसंधी ठरणार आहे. हे केंद्र जून २०२६ पासून सुरू होणार असल्याची माहिती देण्यात आली.

# गीतासार

## अध्याय १८

## मोक्षसंन्यासयोगः

यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहनमात्मनः ।
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥ १८-३९ ॥

जे सुख भोगकाळी आणि परिणामीही आत्म्याला मोह पाडणारे असते, ते झोप, आळस व प्रमाद यांपासून उत्पन्न झालेले सुख तामस म्हटले आहे. ॥ १८-३९ ॥

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः । सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ॥ १८-४० ॥

पृथ्वीवर, आकाशात किंवा देवांत तसेच यांच्याशिवाय इतरत्र कोठेही असा कोणताच प्राणी किंवा पदार्थ नाही की, जो प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या या तीन गुणांनी रहित असेल. ॥ १८-४० ॥

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परन्तप । कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥ १८-४१ ॥

हे परंतपा (अर्थात शत्रुतापना अर्जुना), ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांची कर्मे स्वभावतः उत्पन्न झालेल्या गुणांमुळे निरनिराळी केली गेली आहेत. ॥ १८-४१ ॥

शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च । ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ १८-४२ ॥

अंतःकरणाचा निग्रह, इंद्रियांवर ताबा ठेवणे, धर्मासाठी कष्ट सहन करणे, अंतर्बाह्य शुद्ध राहणे, दुसऱ्यांच्या अपराधांना क्षमा करणे, मन, इंद्रिये व शरीर सरळ राखणे, वेद, शास्त्र, ईश्वर व परलोक इत्यादींवर विश्वास ठेवणे, वेदशास्त्रांचे अध्ययन-अध्यापन करणे आणि परमात्मतत्त्वाचा अनुभव घेणे, ही सर्वच्या सर्व ब्राह्मणाची स्वाभाविक कर्मे आहेत. ॥ १८-४२ ॥

# आरोग्य

## विटामिन बी -१२ कमतरता

### विटामिन बी-12 कमतरतेची लक्षणे काय ?

डॉक्टराच्या मतानुसार विटामिन बी-१२ आपल्या नसांसाठी इतके गरजेचे असते की जर याची कमरतता आपल्या शरीरात झाली तर शरीरात झिणझिण्या येणे, शरीरातील अवयव सुन्न पडणे, स्पर्शज्ञान देखील होत नाही. नसांची ताकद कमी होणे हे देखील लक्षण यात दिसते आणि तसेच विटामिन बी १२ रक्तातील हिमोग्लोबिनच्या निर्मितीसाठी देखील महत्वाचे आहे. याची शरीरात कमतरता झाली तर एनिमिया सारखे आजार होऊ शकतात. एनिमिया या आजारात शरीरात रक्ताची निर्मिती कमी होते. आणि बाहेर शरीरात रक्त पुरवठा करावा लागत असतो.

### विटामिन बी-12 च्या कमीची नेमकी कारणे काय ?

पुरेसा आहार न घेणे, योग्य प्रकारचा सकस आहराचा आपण वापर करत नसलो तर शरीराचे पोषण नीट होत नाही. त्यामुळे आहार हा सकस आणि विविध्यपूर्ण असावा. पोटाच्या समस्या होत असले तर तुमच्या शरीरात बी-१२ ची कमतरता होते. त्यामुळे पोटाचे आजार असतील तरी या विटामिनची कमतरता जाणवते. आतड्यांची समस्या असेल तर हे विटामिन-बी-१२ ची उणीव होते.

# आजचे राशि भविष्य



**मेष**
तुमच्या व्यक्तिमत्वात आणि स्वभावात झालेला बदल उत्कृष्ट असेल. सामाजिक आणि कौटुंबिक सदस्यांकडूनही तुम्हाला विशेष सन्मान मिळेल.

**वृषभ**
मेहनत आणि शक्ती तुमच्या कामात वाहून घ्याल. तुम्हाला लक्षात ठेवावे लागेल की एखाद्या व्यावसायिकाशी भांडणसारखे प्रसंग उद्भवू शकतात.

**मिथुन**
कोणतीही खास गोष्ट कोणाशीही शेअर करू नका. कधी कधी अति स्वकेंद्रित असण्याने परस्पर संबंधांमध्ये काही तणाव निर्माण होतो.तुमच्या

**कर्क**
ध्येय निश्चित करण्यासाठी नवीन योजना कराल, ही योजना भविष्यात प्रभावी ठरेल. आरोग्याशी संबंधित किरकोळ समस्यांमुळे आळस राहील.

**सिंह**
महत्त्वाच्या व्यक्तीच्या आगमनामुळे एखाद्या विषयावर सकारात्मक चर्चा होईल.व्यावसायिक कामकाजात सुधारणा होण्याची अपेक्षा करू नका.

**कन्या**
तुमच्या रागावर आणि रागावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.कौटुंबिक बाबींमध्ये थोडी घाई करावी लागेल. तुमच्या योगदानामुळे तुमचा आदर वाढेल.

**तूळ**
व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल होईल आणि तुमच्या जीवनशैलीबद्दल अधिक जागरूक राहणे इतरांच्या आकर्षणाचे केंद्र बनेल.

**वृश्चिक**
कामकाजावर परिणाम होऊ शकतो.विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांचे पूर्ण सहकार्य मिळेल. लपलेली प्रतिभा ओळखून सर्जनशील कार्यात त्याचा वापर कराल.

**धनु**
प्रलंबित देयके गोळा करण्यासाठी आणि आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी ही वेळ चांगली आहे.आजचा काळ यशाचा आहे.

**मकर**
तुमची वैयक्तिक कामेही आज बऱ्याच प्रमाणात सुरळीतपणे पूर्ण होतील.अज्ञात व्यक्तीशी जास्त संवाद साधल्याने तुमचे नुकसान होऊ शकते.

**कुंभ**
कोणतेही प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस योग्य आहे. कोणतीही योजना राबवण्यापूर्वी कुटुंबातील सदस्यांचा सल्ला अवश्य घ्या.

**मीन**
कोणतेही काम करण्यापूर्वी त्याच्याशी संबंधित माहिती घेतल्यास यश मिळेल. प्रतिभा ओळखाल आणि दैनंदिन दिनचर्या आणि कामाचा क्रम पूर्ण उर्जेने सांभाळाल.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# पनवेल महापालिकेची १३९ कोटींची करवसुली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल** - पनवेल महापालिकेच्या तिजोरीत २१ दिवसात तब्बल १३९ कोटी रुपये मालमत्ता कर स्वरूपात जमा झाले आहेत. आजपर्यंतची ही विक्रमी करवसुली आहे. अभय योजनेच्या काळात तब्बल ५१.८६४ जणांनी या योजनेचा लाभ घेतला. पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी पुढाकार घेऊन १८ जुलै रोजी मालमत्ता करावरील ९० टक्के शास्ती माफीची अभय योजना जाहीर केल्यानंतर त्यास निवासी नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. ७ ऑगस्टला दुपारपर्यंत ५ कोटी ३० लाख रुपये कर स्वरूपात पालिकेकडे जमा झाले. मालमत्ता करावरील शास्तीवर ९० टक्के सवलत मिळविण्यासाठी अभय योजनेची अंतिम तारीख १५ ऑगस्ट आहे. या योजनेत एकरकमी कर भरण्यासाठी रकमेची तजवीज करण्यासाठी करदात्यांची धावपळ होत असल्याने अभय योजनेला अजून मुदतवाढ मिळावी अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# पनवेल मध्ये कचरा संकलनासाठी आयसिटी प्रणालीचा वापर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खारघर, ता. १० (बातमीदार):** पनवेल महापालिका हद्दीतील गावे, सिडको वसाहतीमधील घनकचरा संकलन, वर्गीकरण शास्त्रोक्त पद्धतीने होणार आहे. यासाठी पालिकेकडून आयसिटी प्रणालीचा वापर केला जाणार आहे. यासाठी सोसायटींच्या दर्शनी भागात स्कॅनर लावले जात असून, घनकचरा संकलन करणाऱ्या घंटागाडीवर काम करणारे कामगार आणि पर्यवेक्षकांना नोंद करणे बंधनकारक आहे.

राज्य शासनाने कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण, वाहतूक शास्त्रोक्त पद्धतीने व्हावे तसेच घनकचरा संदर्भात नागरिकांचा अभिप्राय किंवा तक्रार नोंदणीसाठी माहिती तंत्रज्ञानावर आधारित (आयसीटी) प्रणालीचा वापर सुरू केला आहे. राज्य शासनाच्या सूचनांनुसार पनवेल पालिका हद्दीतील गावे आणि शहरातील कचऱ्याचे संकलन होणार आहे, पण अनेकवेळा काही सोसायट्यांमधील कचरा उलचला जात नसल्याच्या तक्रार येतात. त्यानंतर संबंधित विभागातील पर्यवेक्षक त्याची शहानिशा करतो, मात्र आयसिटी प्रणालीच्या नियमानुसार कचरा संकलनासाठी सोसायटीच्या दर्शनी भागात स्कॅनर लावले जाणार आहेत. या प्रणालीमुळे तक्रारींचे प्रमाण कमी होणार आहे. आयसिटी प्रणालीनुसार कचरा व्यवस्थापनाच्या प्रक्रियेत कार्यक्षमता आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग होणार आहे.

# मानसिक छळाला कंटाळून शिक्षकांचे उपोषण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण, ता. १० (वार्ताहर)**

उरण तालुक्यातील प्रसिद्ध जवाहरलाल नेहरू पोर्ट (शेवा) येथील रुस्तुमजी केजरीवाला फाउंडेशन विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आर्थिक व मानसिक त्रास होत आहे. सात वर्षांपासून सुरू असलेल्या वेतन व भत्त्यांच्या थकबाकीला कंटाळून सर्वांनी ११ ऑगस्ट २०२५ पासून आमरण उपोषण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

**या निवेदनाची प्रत आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार मनोहर भोईर यांच्यासह विविध राजकीय नेते, पालक संघटना, शिक्षक संघटना, समाजसेवक, कामगार नेते व प्रशासकीय अधिकाऱ्यांना पाठवण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांनी सागितले की, त्यांनी सर्व मार्गाचा अवलंब करून पाहिला, मात्र न्याय न मिळाल्याने आता लढ्याशिवाय पर्याय उरला नाही. त्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत हा संघर्ष सुरू राहील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.**

क र्मच ाऱ्य ांच्य ा निवेदनानुसार, नव्याने कार्यभार स्वीकारलेल्या रुस्तुमजी केजरीवाला फाउंडेशनने सातवा वेतन आयोग लागू केलेला नाही. त्यासोबतच सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे मिळणारी वार्षिक वेतनवाढ आणि महागाई भत्ताही जुलै २०१९ पासून देण्यात आलेला नाही. यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्यावर आर्थिक संकट ओढवले असून, मानसिक आरोग्यावरही गंभीर परिणाम झाला आहे. शालेय समितीत हा मुद्दा वारंवार मांडला गेला, मात्र प्रशासनाने डोळेझाकच केली, असा आरोप कर्मचाऱ्यांचा आहे.

शासकीय नियमांनुसार शाळेचे हस्तांतरण होऊन जवळपास तीन वर्षांचा काळ उलटला असला तरी कर्मचाऱ्यांच्या मागण्या केवळ कागदावरच राहिल्या आहेत. विविध शासकीय कार्यालयांना अनेकदा पत्रव्यवहार करूनही त्यावर ठोस कार्यवाही झालेली नाही. सहा वर्षापासूनच्या पाठपुराव्यानंतरही प्रश्न प्रलंबित राहिल्याने कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे अखेर कर्मचाऱ्यांनी प्रशासनाला अंतिम इशारा दिला आहे. सात वर्षांची थकीत रक्कम फरकासह बँक खात्यात जमा होईपर्यंत ते जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालय, शेवा, येथील माध्यमिक इमारतीसमोर शांततेच्या मार्गाने आमरण उपोषण करतील. ११ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या या आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

**अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ**

कार्यालय: टिळकपथ, के. बी. रोड , अंबरनाथ जि. ठाणे पिनकोड. ४२१ ५०१
Website : www.ambarnathcouncil.net Phone No. 0251-2682353/18002331106

**जाहिर आवाहन**

अंबरनाथ नगरपरिषदेमार्फत शहरातील सर्व गणेशभक्तांना जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, श्रीगणेश उत्सव साजरा करताना पर्यावरणाची हानी होणार नाही याकरिता शासनाने दिलेल्या निर्देशाचे पालन करण्यात यावे.

- प्लास्टर ऑफ पॅरिस पासुन बनविलेली गणेशमुर्ती उत्सवाकरीता वापरण्यात येऊ नये
- पर्यावरणपुरक शाडुच्या मातीपासुन बनविलेल्या गणेश मुर्तीचा वापर करावा.
- सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने पर्यावरण पुरक अशा पध्दतीने सजावट करावी.
- उत्सवादरम्यान निघालेले निर्माल्य नदीपात्रात विसर्जित न करता नगरपरिषदेने ठेवलेल्या निर्माल्य कलशामध्ये जमा करावे.
- श्रीगणेश मुर्तीचे विसर्जन नदिपात्रात, नैसर्गिक ओढयामध्ये व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतामध्ये न करता नगरपरिषदेने शहरामध्ये विविध ठिकाणी तयार केलेल्या कृत्रिम तलाव, रबरी कुंड यामध्येच करावे.
- कृत्रीम कुंडामध्ये ०६ फुटापेक्षा मोठ्या गणेशमुर्तीचे विसर्जन करण्यात येऊ नये.

सर्व श्रीगणेश भक्तांनी व श्रीगणेश मंडळांनी उपरोक्त सुचनांचे तंतोतंत पालन करुन येणारा उत्सव आनंदाने व आरोग्यमय, पर्यावरण पुरक साजरा करुन नगरपरिषदेस सहकार्य करावे.

जावक क्रमांक :
अंनप/आरोग्य विभाग/२०२५-२६/२०८
दिनांक : ०७/०८/२०२५

सही/-
मुख्याधिकारी,
अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

# कल्याण-शिळ वाहतूक कोंडीवर मनसे नेते राजू पाटील यांची टीका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



डोंबिवली, ता. १० कल्याण-शिळ रस्त्यावर मोठा गाजावाजा करून पलावा सिटीजवळ उड्डाणपूल सुरू करण्यात आला. पण परिस्थिती जैसे थे आहे. रक्षाबंधनाच्या दिवशीही पलावा सिटीजवळ प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. या वाहतूक कोंडीवर मनसे नेते राजू पाटील यांनी 'ह्यांना ना जनाची, ना मनाची' असं म्हणत टीका केली आहे. कल्याण-डोंबिवलीकडे येणाऱ्या कल्याण-शिळ फाट्यावर वाहतूक कोंडी ही काही नवीन नाही. पण या वाहतूक कोंडीवर तोडगा काढत पलावा सिटीजवळ नवीन उड्डाणपूल सुरू करण्यात आला, मात्र हा पूल उद्घाटनापासून वादात अडकला होता. दुसऱ्याच दिवशी पुलावर खड्डयांचं साम्राज्य पसरलं आहे. तर शनिवारी (ता. ९) रक्षाबंधनाच्या दिवशीही पलावा सिटीजवळ प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. चार ते पाच तास गाड्या या एकाच जागी उभ्या होत्या. पुलावर आणि जुन्या मार्गावर दोन्ही बाजूने प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. कल्याण डोंबिवली शहरातील अंतर्गत रस्त्यावरदेखील मोठी वाहन कोंडी झाली होती. यावर मनसेचे नेते राजू पाटील यांनी एक्सवर पोस्ट करीत सत्ताधाऱ्यांवर टीका केली आहे.

**राजू पाटील यांची पोस्ट**

या वाहतूक कोंडीवर मनसेचे नेते राजू पाटील यांनी सोशल मीडियावर खरमरीत पोस्ट लिहिली. रक्षाबंधनाच्या दिवशी नागरिकांना ट्रॅफिकचं आंदण आहे. वर्षानुवर्षे तोच रस्ता, तेच ट्रॅफिक, तीच घुसमट आणि तीच मागणी. आता आम्हालाही त्याच त्या मुद्द्यावरून सरकारला शालजोडीत द्यायला लाज वाटू लागली आहे. पण यांना नागरिकांच्या जीवाची, वेळेची आणि जीवनाची काहीही एक पडलेली नाही. रस्ते रुंदीकरण केले, कितीतरी ब्रिज बांधले, त्याचा मलिदा खाऊन झाला. पुन्हा रस्ते आणि पूल दुरुस्त करण्याची वेळ आली. म्हणजे पुन्हा मलिदा खाण्याची संधी उपलब्ध झाली, अशी टीका पाटील यांनी केली.



# गणेशोत्सवासाठी कल्याण-विठ्ठलवाडी आगारातून ११८ गाड्यांचे आरक्षण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. १० (बातमीदार):** गणेशोत्सवाच्या काळात ठाणे, मुंबई, पालघर व इतर विभागातून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी राज्य परिवहन महामंडळाने मोठ्या प्रमाणात नियोजन केले आहे. खास कोकणातील चाकरमान्यांसाठी २३ ऑगस्टपासून पाच हजार जादा बस सोडण्याचा निर्णय घेतलेला आहे. कल्याण व विठ्ठलवाडी एसटी आगारातूनही ११८ जादा गाड्यांचे आरक्षण झाले असून, त्यामुळे कोकणात प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांची सोय होणार आहे, परंतु ज्यांना आरक्षण मिळू शकले नाही, अशा लोकांसाठी अजूनही गट आरक्षणाचा पर्याय उपलब्ध आहे.

कल्याण एसटी आगारातून एकूण ३० जादा गाड्यांचे ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने आरक्षण झाले आहे, तर विठ्ठलवाडी एसटी आगारातून एकूण ८८ जादा गाड्यांचे आरक्षण झाले आहे. ज्यांना आरक्षणाचा लाभ घेता आला नाही, अशा प्रवाशांसाठी दोन्ही आगारात गट आरक्षण सुरू करण्यात आले आहे. २२ जुलैपासून सुरू झालेल्या या आरक्षणाअंतर्गत शेकडो एसटी गाड्यांचे आरक्षण झाले असून, अजूनही चाकरमानी या पर्यायाचा लाभ घेत आहेत. विशेष म्हणजे गटाने मागणी केलेल्या वेळेनुसार बस प्रवाशांना घेण्यासाठी पोहोचते. आतापर्यंत कल्याण-विठ्ठलवाडी एसटी आगारात शेकडो एसटी बसचे गट आरक्षण झालेले असून, उर्वरित आरक्षण राजकीय पक्षांमार्फतही होत असल्याची माहिती विठ्ठलवाडी आगार व्यवस्थापक नवज्योत गावडे यांनी दिली आहे.

**गट आरक्षणाला एसटीच्या इतर योजनाही लागू**

ही योजना महाराष्ट्रात विविध सण उत्सव आणि हंगामी काळात राबवली जाते. गट आरक्षणाला महामंडळाच्या इतर योजनाही लागू होतात. एसटी प्रवासात महिलांना व ज्येष्ठ नागरिकांना असलेल्या महिला सन्मान योजना, ज्येष्ठ नागरिक व अमृत ज्येष्ठ नागरिक योजनाही गट आरक्षणाला लागू होतात. यानुसार ५० ते १०० टक्के सवलत दरही या योजनेत लागू आहे. उदा. ७५ वर्षांवरील संपूर्ण ४० ज्येष्ठ नागरिकांनी जर एकाच बसचे गट आरक्षण केले असेल, तर ती संपूर्ण बस मोफतपणे सोडणे कोणत्याही एसटी आगाराला बंधनकारक असेल.

# २१ वर्षानंतर श्रावणात अंगारकी चतुर्थी !

## टिटवाळा गणेशमंदिर संस्थानातर्फे भाविकांसाठी सुसज्ज व्यवस्था

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण – २१ वर्षानंतर अंगारकी चतुर्थी आणि श्रावण महिना हा योग मंगळवार, १२ ऑगस्ट रोजी जुळुन आला आहे. या योगानिमित्त टिटवाळा येथील प्रसिध्द श्री सिध्दीविनायक मंदिरात भाविक लाखोच्या संख्येने येण्याची शक्यता विचारात घेऊन श्री सिध्दीविनायक मंदिर ट्रस्टने भाविकांना रांगेतून श्रध्देने दर्शन घेता यावे म्हणून सुसज्ज व्यवस्था केली आहे, अशी माहिती टिटवाळा येथील श्री सिध्दीविनायक मंदिर ट्रस्टचे विश्वस्त सुभाष जोशी यांनी दिली.

मध्य रेल्वेच्या मुंबई ते कसारा रेल्वे मार्गावरील ठाणे जिल्ह्यातील टिटवाळा येथील श्री सिध्दीविनायक मंदिर भाविकांचे श्रध्दास्थान आहे.



मंदिरालगतचे वाहनतळ भाविकांच्या वाहनांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. या जागेत रुग्णवाहिका, अग्निशमन वाहन, अत्यावश्यक सेवेची वाहने, पोलीस वाहनांसाठी जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. भाविकांनी मंदिरापासून दूर अंतरावरील वाहनतळ, रस्ते मार्गाच्या कडेला वाहतुकीला अडथळा होणार नाही अशा पध्दतीने वाहने उभी करावीत, असे आवाहन मंदिर ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागातून भाविक याठिकाणी दर्शनासाठी येतात. दररोज सुमारे पंचवीस ते तीस हजार भाविक, संकष्टी चुतर्थी असेल त्या काळात सुमारे लाखभर भाविक दर्शनासाठी येतात. अंगारकी चतुर्थीच्या दिवशी भाविकांची ही संख्या सुमारे सव्वा लाख ते दीड लाखापर्यंत जाते. हा अनुभव विचारात घेऊन श्री सिध्दीविनायक मंदिर ट्रस्टने मंदिर परिसरात भाविकांना सरळमार्गी दर्शन घेता यावे म्हणून सुसज्ज नियोजन केले आहे.

८ ऑगस्ट २००५ रोजी श्रावण महिन्यात अंगारकी चतुर्थीचा योग आला होता. श्रावण मास, चातुर्मास अशा उपवासाच्या महिन्यात हा योग आला आहे. श्री सिध्दीविनायक मंदिर परिसरात तलावालगत निवारा असलेला कायमस्वरुपी दर्शन मंडप आहे. पाऊस असला तरी भाविकांना सुस्थितीतपणे या निवाऱ्याखाली उभे राहण्याची सोय आहे. मंदिरा बाहेरील भागात कोणीही भाविकाने दर्शनासाठी मध्ये घुसू नये म्हणून मंदिराच्या पोहच मार्गावरील प्रवेश मार्गापासून रस्ता रोधक लावण्यात आले आहेत. टिटवाळा रेल्वे स्थानक किंवा रस्ते मागनि मोटारीने आलेला भाविक थेट मंदिराकडे न येता तो दर्शन रांगेत उभा राहील अशी व्यवस्था करण्यात आली आहे.



# अंबरनाथच्या आमा संघटनेचे उद्योग वास्तवावर धक्कादायक खुलासे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः** राज्यातले उद्योग परराज्यात जात असल्याची ओरड अनेक विरोधी पक्षातल्या नेत्यांनी यापूर्वी केले होते. दलाली, दहशत माजवत उद्योजकांना कसा त्रास दिला जातो हे सातत्याने सांगितले जात होते. मात्र सारे काही अलबेल असल्याचे सांगत सरकार वेळ मारून नेत होती. मात्र याबाबत आता उद्योजक आणि त्यांच्या संघटना उघडपणे बोलू लागल्या आहेत. नुकत्याच एका पत्रकार परिषदेत अंबरनाथच्या आमा या संघटनेने याबाबत धक्कादायक खुलासे केले आहेत. अंबरनाथ एमआयडीसी परिसरात दलालांचा प्रभाव इतका वाढला आहे की, एमआयडीसीचे भूखंड मूळ किमतीच्या चार ते पाच पट दराने विकले जात असल्याचा गंभीर आरोप येथील उद्योजकांच्या 'आमा संघटने'ने केला आहे. या संदर्भात अंबरनाथ येथे आयोजित पत्रकार परिषदेत संघटनेचे अध्यक्ष उमेश तायडे यांनी अनेक धक्कादायक खुलासे केले.



# दुकानाचा स्लॅब कोसळून एकाचा मृत्यू - एक गंभीर जखमी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :-** मिरा रोड येथील नया नगर भागात दुकानाचा स्लॅब कोसळल्याने एका वृद्ध व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तर आणखी एक जण यात गंभीर जखमी झाले असून खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहे.

अकील कुरेशी (६८) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. ते मिरा रोडच्या साहिल इमारतीच्या दुकानात राहत होते. दरम्यान शुक्रवारी सायंकाळी अचानकपणे या दुकानाच्या छताचा स्लॅब कोसळला. हा स्लॅब थेट अंगावर कोसळल्याने त्यात अकील कुरेशी आणि त्यांचा सहकारी अडकून पडला. या घडलेल्या घटनेमुळे आजूबाजूच्या परीसरात खळबळ उडाली होती.

स्थानिकांनी याची माहिती पालिकेच्या अग्निशमन दलाला दिली. या घटनेची माहिती महापालिकेच्या अग्निशमन विभागाला मिळताच बचावकार्य राबववून दोघांना बाहेर काढण्यात आले. मात्र यात अकील कुरेशी यांचा मृत्यू झाला होता. तर दुसरा इसम गंभीर जखमी झाला होता. त्यामुळे त्याला जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असल्याची माहिती पालिकेच्या अग्निशमन विभागाकडून देण्यात आली आहे. या घडलेल्या घटनेमुळे पुन्हा एकदा शहरातील जीर्ण झालेल्या इमारतींचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# भिवंडीत ५३ लाखांचा गुटखा जप्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. १० (वार्ताहर) :** शहरात मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटखा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती भिवंडी गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी नारपोली परिसरात सापळा रचला असता, शहरात विक्रीसाठी ट्रकमधून आणलेला ५३ लाखांचा गुटखा गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी ट्रकचालकाला अटक करण्यात आली आहे.

राज्यात गुटखाविक्रीस मनाई असताना भिवंडी शहरात मोठ्या प्रमाणावर गुटखा सर्रासपणे विक्री होत आहे. मोहम्मद गणी पटेल (वय ४४, रा. तडोला गाव, जिल्हा बिदर, कर्नाटक) या ट्रकचालकाने ५३ लाख ३० हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व सुगंधित सुपारी शहरात विक्रीसाठी आणली होती. याप्रकरणी पोलिसांना माहिती मिळाल्याने शुक्रवारी (ता. ८) सापळा रचत चालकाला अटक केली. याप्रकरणी गुन्हे शाखेचे पोलिस हवालदार साबीर शेख यांच्या फिर्यादीवरून नारपोली ठाण्यात ट्रकचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. हा गुटखा नेमका कोणी व कुठे विक्रीसाठी आणला होता, याचा तपास भिवंडी गुन्हे शाखा करीत आहे.

# कबुतरखान्याचा वाद चिघळणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून कबुतरखाना बंदी प्रकरणी वाद उफाळला आहे. नुकतेच मुंबईतील प्रतिष्ठित दादर कबुतरखाना ट्रस्टने आता एक बोर्ड लावला आहे आणि कोणीही कबुतरांना खाऊ घालू नये असे आवाहन केले आहे. जर कोणतीही कारवाई झाली तर ट्रस्ट जबाबदार राहणार नाही असे ट्रस्टने स्पष्ट केले आहे. ट्रस्टने या संदर्भात महानगरपालिकेकडे परवानगी मागितली असून महानगरपालिकेने सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत कबुतरांना खाऊ घालण्याची तोंडी परवानगी दिली आहे. अशातच दादर कबूतरखाना प्रकरणावरून स्थानिक मराठी नागरिकांनी सरकार आणि पोलीस प्रशासनाला थेट सवाल करण्याचा निर्णय घेतला आहे.

# भरती प्रक्रिये अभावी शिक्षकांवर अतिरिक्त ताण

## जिल्हा परिषद शाळांमध्ये केंद्र प्रमुखांची कमतरता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** वसई विरार शहराच्या वाढत्या नागरिकरणाच्या सोबतच शाळांची संख्येतही वाढ होऊ लागली आहे. परंतु मागील काही वर्षांपासून वसईच्या शिक्षण विभागात अपुरे मनुष्यबळ असल्याने अडचणी कायम आहेत. नऊशेहून अधिक मंजूर पदे असूनही सद्यस्थितीत केवळ ६५५ इतकेच मनुष्यबळ उपलब्ध आहे.

वसई विरार शहरात अनधिकृत शाळांचे जाळे वेगाने पसरू लागले आहे. त्यातच शिक्षण विभागाचे दैनंदिन कामकाज यासर्व गोष्टीकडे लक्ष देण्यासाठी मनुष्यबळाची गरज आहे. मात्र प्रशासनाकडून शिक्षणविभागाला मनुष्यबळ मिळत

**वसईत १३ केंद्र प्रमुखांची पदे मंजूर करण्यात आली आहेत. मात्र केवळ कामण, वालीव, बोळींज अशा तीनच ठिकाणी केंद्र प्रमुख उपलब्ध आहेत. अन्य ठिकाणच्या केंद्रावर शिक्षकांना अतिरिक्त भार देऊन केंद्रप्रमुखांची कामे करवून घेतली जात आहेत. अजूनही केंद्र प्रमुखांची भरती प्रक्रिया पूर्ण केली नसल्याने जिल्हा परिषद शाळांमध्ये केंद्र प्रमुखांची कमतरता भासत आहे.**

नसल्याने आहे त्या कर्मचारी आहेत त्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त भार सोपवून कामकाज करावे लागत आहे.

वसईत शहरी व ग्रामीण मिळून एक हजारांहून अधिक शाळा आहेत. त्यात १९२ शाळा जिल्हा परिषदेच्या आहेत. या शाळांचे नियंत्रण वसईच्या शिक्षण विभागाकडून पाहिले जाते. तसेच शिक्षणाच्या संबंधित शासनाचे विविध उपक्रम ही राबविले जातात. यामध्ये गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, लिपिक, केंद्रप्रमुख, समाजशास्त्र, विज्ञान, भाषा शिक्षक, सफाई कर्मचारी, व इतर कर्मचारी यांचा समावेश आहे.

विशेषतः इतक्या मोठ्या तालुक्यात गटशिक्षण अधिकारी पद प्रभारी म्हणून ठेवण्यात आले आहे. तसेच पंचायत समिती शिक्षण विभागात केंद्रप्रमुख हा महत्त्वाचा घटक समजला जातो. गावातील शाळा तेथील शिक्षक, पालक ग्रामस्थ यांच्यात समन्वय साधून शैक्षणिक ध्येय धोरण व अन्य कामकाजातील महत्त्वाची भूमिका केंद्र प्रमुखामार्फत बजावली जाते.

विशेषतः इतक्या मोठ्या तालुक्यात गटशिक्षण अधिकारी पद प्रभारी म्हणून ठेवण्यात आले आहे. तसेच पंचायत समिती शिक्षण विभागात केंद्रप्रमुख हा महत्त्वाचा घटक समजला जातो. गावातील शाळा तेथील शिक्षक, पालक ग्रामस्थ यांच्यात समन्वय साधून शैक्षणिक ध्येय धोरण व अन्य कामकाजातील महत्त्वाची भूमिका केंद्र प्रमुखामार्फत बजावली जाते.



# एटीएम फोडीचा प्रयत्न : दोघांना बाजारपेठ पोलीसांच्या बेड्या

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिमेतील अत्रे रंगमंदिरा शेजारी असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या एटीएममध्ये दोन अज्ञात इसमांनी एटीएम मधील पैसे चोरी करण्याच्या उद्देशानेहे एटीएम दगडाच्या सहाय्याने तोडले परंतु त्यांना या एटीएम मधील पैसे काढता आले नाही. हे एटीएम तोडताना अज्ञात इसमांनी एटीएमचे सुमारे दोन लाखाचे नुकसान केले होते. याबाबत सेंट्रल बँक येथील मॅनेजर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बाजारपेठ पोलीसांनी गुन्हा दाखल केला होता. याठिकाणी असलेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या साह्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश सिंग गौड यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत आंधळे व तपास पथकातील पोलीस हवालदार प्रेम बागुल, रमाकांत पाटील, रवींद्र भालेराव, परमेश्वर बाविस्कर, पोलीस शिपाई अरुण आंधळे, राहुल इशी यांनी बाजारपेठ पोलीस स्टेशन हद्दीत परिणामकारक गस्त करून बाजारपेठ पोलीस ठाणे हद्दीतून फुटेज मध्ये दिसत असल्याप्रमाणे दोन संशयित इसम यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्यांनी या गुन्ह्याची कबुली दिल्याने अवघ्या काही तासात हा गुन्हा उघडकीस आणण्यात बाजारपेठ पोलीस स्टेशनला यश आले आहे. या प्रकरणी मंगेश भीमराव जगताप, वय 36 वर्ष, राहणार घाटकोपर वेस्ट आणि नौशाद अहमद अन्सारी, वय 22 वर्ष, राहणार कल्याण या दोन आरोपींना अटक केली असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांनी दिली.

### ‘घरोघरी तिरंगा’ अभियानांतर्गत
# केडीएमसी विद्युत विभागामार्फत सायकल रॅली

दै.ठाणे जीवनदीप वार्ता


कल्याण : शासनाच्या निर्देशानुसार हर घर तिरंगा म्हणजे घरोघरी तिरंगा या अभियानांतर्गत आज सकाळच्या प्रहरी महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या सायकल रॅलीस उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. कल्याण डोंबिवलीतील कल्याण सायकलीस्ट ग्रुप, डोंबिवली सायकलीस्ट ग्रुप ,हिरकणी महिला सायकलिस्ट ग्रुप, पलावा सायकलिस्ट ग्रुप, बाईकपोस्ट सायकलिस्ट ग्रुप,एव्हरग्रीन सायकलप्रेमी ग्रुप ,डोंबिवली या संस्थांच्या सुमारे २०० सदस्यांनी, सायकल प्रेमींनी या रॅलीत सहभाग घेतला होता.



या सायकल रॅलीचे उद्घाटन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी केले. महापालिका आयुक्त अभिनव गोयल, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड आणि विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी आयुक्त निवासापासून महापालिका मुख्यालयापर्यंत स्वतः सायकल चालवीत तदनंतर सायकल रॅलीतही समक्ष सहभाग घेतला.

तिरंग्याविषयी अभिमान, देशभक्तीची प्रेरणा आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश ही रॅली नागरिकांपर्यंत पोहोचवेल , असे प्रतिपादन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी केले . या सायकल रॅलीच्या माध्यमातून नुकत्याच झालेल्या ऑपरेशन सिंदूर मध्ये भारतीय जवानांनी गाजवलेल्या शौर्याला मानवंदना देण्यासह आपल्या वीर जवानांविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा सायकल रॅलीचा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सायकल हा आरोग्यदायी जीवनशैलीचा उत्तम पर्याय असल्याचे मत आयुक्त अभिनव गोयल यांनी व्यक्त केले.

या समयी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, उपायुक्त संजय जाधव, समीर भूमकर कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत घनश्याम नवांगुळ, योगेंद्र राठोड ,महापालिकेचे ब्रँड ॲम्बेसिडर डॉ. प्रशांत पाटील, आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन धावपटू दिलीप घाडगे, महापालिकेचे सहा.आयुक्त धनंजय थोरात, उमेश यमगर तसेच इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.




# एम्स हॉस्पिटलच्या चौथ्या माळ्यावरुन तरुणाची उडी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : शहरतील एम्स रुग्णालयाच्या चौथ्या मजल्यावर एका तरुणाने उडी मारल्याची धक्कादायक घटना आज संध्याकाळी घडली. रोहित कटके असे या तरुणाचे नाव आहे. या घटनेतून रोहित बचावला आहे. त्याच्यावर एम्स रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

बिलाच्या वादातून तरुणाने हा प्रकार केल्याचे समोर येत असले तरी रुग्णालय प्रशासनाने बिलाचा वाद नसल्याचे स्पष्ट केले आहे. एम्स रुग्णालयात रोहितची आई मंदा कटके यांच्यावर उपचार सुरु आहेत. त्यांना दीड वर्षांपासून कॅन्सर झाला आहे. मंदा कटके यांना काल बुधवारी उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन जवान घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान चौथ्या मजल्यावरुन रोहितने उडी घेतली जखमी रोहितवर ताबडतोब एम्स रुग्णालयात उपचार सुरू केले.

### स्काऊट गाईड युनिट विद्यामंदिरचा
# रक्षाबंधन एक सामाजिक बांधिलकी उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : रेल्वे सुरक्षा बल टिटवाळा, रेल्वे स्टेशन स्टाफ आणि लोहमार्ग पोलिस टिटवाळा येथील अधिकारी आणि कर्मचारी यांना स्काऊट गाईड च्या विद्यार्थिनी यांनी राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. या वेळीआरपीएफचे आशू शर्मा आणि रेल्वे स्टेशन मास्टर सत्यवीर सिंह यांनी विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन केले.



शाळेचे स्काऊट मास्टर गोपाळ दीक्षित आणि गाईड कॅप्टन कांचन गोल्हे यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी हा उपक्रम संपन्न केला.

# डि.ए.व्ही शाळेतील विद्यार्थिनींचे पोलिसांसोबत रक्षाबंधन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राखी पौर्णिमेच्या निमित्ताने डि ए व्ही स्कुलच्या प्राचार्या सुमन प्रधान यांचे मार्गदर्शनाखाली इ. ७ वीतील गाईडच्या विद्यार्थीनींनी रबाळे पोलीस ठाण्यात भेट देऊन पोलिसांच्या मनगटावर राखी बांधली. या उपक्रमातून त्यांनी पोलिस बांधवांप्रती आदर, कृतज्ञता आणि भावबंध व्यक्त केला. व दीघायुष्य, निरोगीपणा आणि सुरक्षिततेसाठी शुभेच्छा दिल्या.



पोलिस दल दिवस-रात्र नागरिकांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असतात. त्यांच्या शौर्य, निःस्वार्थ सेवाभाव आणि कर्तव्यनिष्ठेला वंदन करण्यासाठी गाईडच्या मुलींनी हा आगळावेगळा उपक्रम राबवला. विद्यार्थीनींनी प्रथम पोलीस अधिकाऱ्यांना राखी बांधली, त्यानंतर सर्व कर्मचाऱ्यांना राखी बांधून मिठाई वाटली. यावेळी “आपण आमचे खरे संरक्षक आहात” अशा भावनिक शब्दांत त्यांनी पोलिसांचे आभार मानले.

या प्रसंगी पोलीस निरीक्षकांनी विद्यार्थिनींचे कौतुक करत सांगितले की, “राखी ही केवळ भाऊ-बहिणींचा सण नसून, जबाबदारी व संरक्षण यांचे प्रतीक आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात आपुलकी आणि ऐक्य वाढते.” कार्यक्रमात गाईड कॅप्टन पुष्पा जगताप पाडळे व सह शिक्षिका मनुजा मुंडे यांनी विद्यार्थिनींना रक्षाबंधनाचा अर्थ बंधू-भगिनींच्या नात्यातील महत्त्व आणि पोलिसांचे समाजातील योगदान याबद्दल मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षकवर्ग आणि पोलीस स्टेशनचे अधिकारी मोटे साहेब यांनी विशेष सहकार्य केले. हा उपक्रम विद्यार्थिनींमध्ये समाजाबद्दल आदर आणि आपुलकीची भावना जागवणारा ठरला.

# सावरोली जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी सुरक्षा सभेचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : पिवळी केंद्रातील जिल्हा परिषद शाळा सावरोली खुर्द येथे शाळा व्यवस्थापन समिती, सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा समिती तसेच सर्व पालक यांची संयुक्त सभा घेण्यात आली.

येथील विद्यार्थ्यांची सुरक्षा व मिळणाऱ्या शैक्षणिक, भौतिक सुविधा या विचारविनिमयसाठी या सभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर सभेनंतर शाळेत विद्यार्थी उपक्रमा अंतर्गत विद्यार्थी उपस्थिती वाढविण्याकामी त्याचबरोबर जागतिक आदिवासी दिन व रक्षाबंधन या सणाचे महत्त्व समजावून देण्यासाठी रक्षाबंधन व जागतिक आदिवासीं दिन हे सण मोठ्या उत्साहात व आनंदाने साजरे करण्यात आले.




या कार्यक्रमावेळी सरपंच प्रणवी गुरुडे, सदस्य माधुरी विदे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नरेंद्र भोईर, केंद्र प्रमुख प्रभाकर जाधव, समिती पदाधिकारी, पालक, ग्रामस्थ व माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले तर या कार्यक्रमासाठी शिक्षिका प्रिती पवार, शिक्षक होनाजी मुठे आदिंनी नियोजन करून परिश्रम घेतले होते.

# कल्पेश ठाणगे यांना समाजरत्न पुरस्कार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मागील 15 वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रिय राहून आरोग्य, शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य ह्या क्षेत्रात काम करत न्याय - अन्यायाविरुद्ध लढे उभारले. अनेक गरजू रुग्णांना आर्थिक मदत उपक्रम, अनेक रुग्णांना दुरवर हॉस्पिटलमध्ये घेऊन जाऊन उपचार करून आणणे, मूकबधिर - कर्णबधिर मुलांसाठी उपक्रम, संगणक शिक्षण क्षेत्रात मोफत संगणक साक्षरता अभियान राबविणे, कोविड काळातील रुग्णसेवा, 10 वी 12 विच्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी मोफत मार्गदर्शन सत्रांचे आयोजन, ग्रामीण भागातील 5 वी पासूनच्या विद्यार्थ्यांना नोकरभरती, स्पर्धा परीक्षेची तयारी, अभ्यास व्हावा ह्यासाठी स्पर्धा परीक्षा व्यासपीठ उभे केले. समाजातील वंचितांसाठी आदिवासी आधार फाउंडेशन ची स्थापना, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी क्रांतिज्योत ह्या शैक्षणिक संस्थेची स्थापना तसेच समाजातील यशस्वी युवा उद्योजक. ह्या सगळ्याची दखल घेत ह्याआधी सुद्धा मराठा सेवा संघाच्या वतीने "बहुजन समाज भूषण पुरस्कार" देऊन त्यांना सन्मानित केले होते. सोबतच आज 9 ऑगस्ट जागतिक आदिवासी दिन निमित्ताने संयुक्त उत्सव कमिटी वाडा तालुक्याच्या वतीने वाड्याचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे आणि गटविकास अधिकारी वैभव शिंदे ह्यांच्या हस्ते 2025 चा "समाजरत्न पुरस्कार" देऊन सन्मानीत करण्यात आले. ह्यापुढेही आपल्याकडून समाजहितासाठी नेहमीच योगदान राहील असा विश्वास पुरस्कारार्थी कल्पेश ठाणगे ह्यांनी व्यक्त केला. ह्याच कार्यक्रमात इतर समाजरत्न, तसेच विद्यार्थी, महिला बचत गट, शासकीय पदाधिकारी, कलावंत ह्यांनासुद्धा कमिटीच्या वतीने सन्मानित करण्यात आले.



### भिवंडीत जिल्हा परिषद गटांच्या
# प्रभाग रचनेची कोकण आयुक्तांकडे हरकत

## शिवसेना न्यायालयात धाव घेऊ - तालुका प्रमुखांचा इशारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : ठाणे ग्रामीण जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या निवडणुकांचे पडघम वाजायला लागले आहेत.त्यासाठी नव्याने प्रभाग रचना बनविण्यात येत असून ठाणे जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या भिवंडी तालुक्यातील प्रभाग रचना बनविताना निवडणूक आयोग कडील आदर्श प्रभाग रचनेबाबतच्या सूचनांना हरताळ फासण्यात आल्याची तक्रार अँड.सुजित भोईर व शिवसेना (ठाकरे) पक्षाचे विभागप्रमुख शरद पाटील यांनी
ठाणे जिल्हाधिकारी व कोकण आयुक्त यांच्याकडे केली आहे. योग्य न्याय न मिळाल्यास न्यायालयात धाव घेणार असल्याची माहिती भिवंडी शिवसेना तालुका प्रमुख करसन ठाकरे यांनी दिली.



शासन निर्णयानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणांची प्रभाग रचना निश्चित करावयाची होती.त्यामध्ये भौगोलिक कारणांमुळे दहा टक्के कमाल व किमान वाढ करण्याचे निर्देश दिले आहेत.त्या नुसार भिवंडी ग्रामीणची जिल्हा परिषद क्षेत्रातील लोकसंख्या ४,३१,७२१ एवढी आहे. त्यानुसार २१ जिल्हा परिषद व ४२ पंचायत समिती गणांची निर्मिती करताना जि.प. साठी २०,५५८ तर पं.स.साठी १०२७९ ही लोकसंख्या प्रमाण मानण्यात आली आहे.असे असताना प्रशासनाने भिवंडी तालुक्यातील गट व गणांची प्रभाग रचना करताना जिल्ह्यात सर्वात मोठा गट म्हणून राजनोली गटाची निर्मिती केली आहे. ज्याची लोकसंख्या २५५७५ व त्यामधील पं.स राजनोली व गोवे यांची गणांची लोकसंख्या अनुक्रमे १२२४० व १३३३५ अशी आहे.तर नजीकच्या अंजूर जिल्हा परिषद गटाची लोकसंख्या दहा टक्के किमान पेक्षा कमी ठेवली
असल्याची माहिती अँड सुजित भोईर यांनी दिली.

२०१७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत पिंपळघर गावचा समावेश अंजूर गटात होता जो या निवडणुकीत राजनोली गटात करण्यात आला आहे.विशेष म्हणजे लोकसंख्या वाढ करताना भौगोलिक रचना विचारात घेणे गरजेचे असताना सलगता नसलेल्या गावाची लोकसंख्या राजनोली गटात जोडण्यात आली आहे अशी तक्रारी जिल्हाधिकारी व कोकण विभागीय आयुक्त यांच्याकडे करण्यात आली आहे.

राजनोली गणात पिंपळघर,सरवली या गावांचा समावेश आहे. तर गोवे गणात पिंपळास, पिंपळघर, गोवे या गावांचा समावेश आहे. तर नजीकच्या अंजूर गणात दिवे अंजूर, अंजूर, भरोडी, आलीमघर या गावांचा समावेश आहे तर वेहळे गणात सुरई सारंग, वेहळे, पिंपळनेर, पिंपळघर यांचा समावेश केला आहे. यामध्ये अंजूर व वेहळे गणांची लोकसंख्या अनुक्रमे १०४२१ व ८०४९ आहे.ज्यामुळे अंजूर जिल्हा परिषद गटाची लोकसंख्या १८४७० एवढी ठेवली आहे.या मध्ये पिंपळास गावचा समावेश अंजूर गटात करावा अशी मागणी करण्यात आली आहे.याशिवाय भाजपा मंडळ अध्यक्ष नीलेश गुरव,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष गणेश गुळवी,भाजपाचे बाळकृष ठाकरे यांनी सुद्धा तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रभाग रचने संदर्भात हरकती घेतल्या आहेत.

प्रभाग रचना बनवताना अनेक त्रुटी आढळून येत आहेत शासन निर्णयानुसार राजनोली गटाची लोकसंख्या कमाल लोकसंख्ये पेक्षा २४ टक्के अधिक आहे तर अंजूर गटाची लोकसंख्या किमान लोकसंख्येपेक्षा १२ टक्के कमी आहे हा दूजाभाव आहे.त्यानी केलेल्या तक्रारीनुसार पिंपळास ही गाव अंजूर गटात समाविष्ट केल्यास समतोल राखला जाईल.या तक्रारी बाबत कोकण विभागीय आयुक्त हे योग्य तो न्याय देतील अशी अपेक्षा व्यक्त केली. योग्य न्याय न मिळाल्यास न्यायालयाचे दरवाजे ठोठावले जातील अशी माहिती शिवसेना(ठाकरे) पक्षाचे तालुकाप्रमुख करसन ठाकरे यांनी दिली आहे.

### सुहित जीवन ट्रस्ट मध्ये
# विशेष विद्यार्थ्यांना विविध वस्तूंचे वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : सुहित जीवन ट्रस्ट संचालित सुमंगल बौद्धिक अक्षम मुलांची शाळा आणि एकलव्य व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, पेण - रायगड मध्ये पालक सभा आयोजित करण्यात आली. यावेळी पालक खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी सुरक्षितता, दिशा अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांसाठी विविध शासकीय योजना व संस्थेमधील विविध समित्या तसेच इतर अन्य विषयांवर चर्चा करण्यात आली. सभेमध्ये



विद्यार्थ्यांची सुरक्षितता, स्वच्छता आणि प्रगती, दिशा असेसमेंट केल्यानंतर जे दिशा वर्कशिटचा वापर करून गृहकार्य आहेत त्यावर पालकांनी कोणत्या पद्धतीने काम करावे याचे मार्गदर्शन करण्यात आले. शैक्षणिक वर्ष 2025 - 26 मध्ये होणाऱ्या उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा पुरवून त्यांचे शिक्षण व प्रशिक्षण अधिक आनंददायी व सुसूत्रीत करण्यासाठी आज विद्यार्थ्यांनासंस्थेकडूनस्कूल बॅग, शूज, ट्रॅक पॅन्ट व टी-शर्ट यांचे वाटप प्रसाद कालेकर ( नायाब तहसीलदार, पेण) यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. यावेळी श्री.कालेकर यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी संस्थेमध्ये वेळोवेळी राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांचे विशेष कौतुक केले व ह्या विशेष मुलांच्या संस्थेसाठी काही करता येणे हे आमचे परम भाग्य आहे असे सांगितले व या मुलांच्या प्रगतीचे खूप कौतुक केले. साहित्य मिळाल्याने विद्यार्थी व पालक यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. उपस्थित सर्व पालकांनी या उपक्रमाचे खूप कौतुक केले व संस्था आपल्या पाल्यांसाठी पुरवित असलेल्या सर्व सुविधांसाठी त्यांनी संस्थेचे आभार मानले.

# देसले दांम्पत्याकडून आदिवासी बांधवांना विकासाची भेट!

## लांबाच्या वाडीतील हायटेक वास्तुंचे आमदार कथोरेंच्या हस्ते लोकार्पण!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड नगरपंचायत मधील प्रभाग क्रमांक 2 मधील आदिवासी बहुल लोकवस्ती असलेल्या भागात स्वातंत्र्याच्या 76 वर्षा नंतर विकास दिसून आला असून स्थानिक नगरसेविका मानसी मनोज देसले व त्यांचे पती जनसेवक मनोज रमेश देसले यांनी कार्यसम्राट आमदार किसन कथोरे यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली संपूर्ण कायापालट केला असून कधी नव्हे ती विकासाची विविध कामे पाहायला मिळत आहेत.

यामध्ये सुसज्ज नविन सभागृह,तरूणांसाठी अद्ययावत व्यायामशाळा,व बलोपासनेसाठी हनुमंताचे मंदिर या हायटेक वास्तुंचे लोकार्पण आदिवासी गौरव दिनी करून आदिवासी बांधवांना एक अनोखी भेट दिली आहे.

मुरबाड तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण ठाणे जिल्हात अशा प्रकारचा आदिवासी वस्तीतील विकास पाहायला मिळत असून देसले दांपत्यांनी हे काम करून दाखविल्या बद्दल आमदार कथोरे यांनी दोघांचे मनापासून कौतुक केले आहे. तुम्ही काम करत राहा मी तुमच्या पाठीशी आहे काही नगरसेवक बोलण्यात पोपट आहेत. माझ्याशिवाय ते नगरपंचायत मध्ये कशी कामे करतात हे मला पाहायचे आहे असा सज्जड दम त्यांनी पक्ष सोडून गेलेल्या त्या नगरसेवकांना दिला आहे.मुरबाडचा विकास थांबणार नाही तर तो अधिक जोमाने होत राहिल पाहिजे तेवढा निधी मुख्यमंत्री द्यायला तयार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले .



तर यावेळी जनसेवक मनोज देसले यांनी आपल्या भावना व्यक्त करताना आम्ही राजकारणात तत्वाशी गद्दारी करणार नाही एकवेळ राजकारण सोडू पण गद्दारी नाही. जे आहे ते प्रामाणिक पणे करतो .समाजाजाप्रती आपल्या भावना काय आहेत हे महत्वाचे असल्याची भावना प्रास्ताविकात व्यक्त केली. तर या प्रसंगी स्थानिकांनी देसले दांपत्या विषयी भावना व्यक्त करताना असा नगरसेवक आमच्या आयुष्यात कधी पाहिला नसून प्रत्येकाच्या सुख दुखात येऊन चौकशी करणारा हा नगरसेवक असून कधी नव्हे तो आमच्या वाडीचा विकास केल्या बद्दल ग्रामस्थांच्या वतीने मानसी देसले व मनोज देसले यांचा भव्य सन्मान करण्यात आला.

या लोकार्पण सोहळ्यासाठी सुरेश बांगर, दिपक पवार, सुधीर तेलवणे,मोहन सासे,नगरसेविका मधुरा सासे, साजई सरपंच सौ.सासेताई, तानाजी मोरे,अक्षय रोठे,कृष्णकांत मलिक, दिनेश उघडे,जगन माळी, केशव देसले, मिलींद मडके, सचिन चौधरी, अक्षय आगिवले, यांच्यासह मोठ्या संख्येने आदिवासी बांधव उपस्थित होते. यावेळी आदिवासी महिला व तरूणींनी पारंपरिक आदिवासी पद्धतीने नृत्य सादर करून आमदार कथोरेंचे स्वागत केले.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.